**<u>शालेय स्तरावर पर्यावरण सेवा योजना राबविण्याबाबत</u>**

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१०/प्र.क्र.८/तां.क.३
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १४ जानेवारी, २०११.

**प्रस्तावना**:

अमूल्य नैसर्गिक सेवा पुरवणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचे, आजच्या गतिमान विकास प्रक्रियेपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. संसाधनांचा अतिवापर, गैरवापर, कचरानिर्मिती यामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास हा आजच्या अशाश्वत विकास प्रक्रीयेचा एक भाग आहे. आपल्या कायदेप्रणालीमध्ये नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणार्थ अनेक कायदे व नियमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. परंतु, याचा आवश्यक तेवढा प्रभाव लोकांवर पडलेला नाही. यासाठी जनतेमध्ये सर्व स्तरांवर 'पर्यावरण जागृती' आणि त्याद्वारे पर्यावरण 'जतन करण्याची प्रेरणा' जागृत करुन, पर्यावरण संवर्धनात महत्वाची भूमिका बजावण्यासाठी जनतेला सर्वोतोपरी सक्षम करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी एखादी प्रभावशाली योजना प्रस्तुत करुन ती सक्षमपणे राबविण्याचा शासन प्रयत्नशील असून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन होता.

## २. **शासन निर्णय** :

सध्या शालेय स्तरावर 'पर्यावरण' विषय अनिवार्य करण्यात आला आहे. परंतु, हा विषय केवळ वर्गामध्ये न शिकवता निसर्गाच्या सानिध्यात प्रत्यक्ष कृतीच्या आधारे या विषयाबद्दल मुलांच्या मनात जागृती व चेतना निर्माण करुन, बालपणापासूनच असे आधारस्तंभ तयार करणे गरजेचे आहे, जेणेकरुन भावी पिढी 'पर्यावरण संवेदनशील व सजग' होईल. करीता याच उद्देशाने महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये '<u>पर्यावरण सेवा योजना</u>' (Environmental Service Scheme{ESS}) राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेची रुपरेषा पुढीलप्रमाणे आहे :-

## २.१ **योजनेची उद्दिष्टे :**

२.१.१ स्थानिक पर्यावरणाशी निगडीत समस्या, प्रत्यक्ष सहभाग व कृतीच्या आधारे समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यास प्रोत्साहन देणे,
२.१.२ निसर्ग व मानव यांच्यातील नातेसंबंध समजून घेऊन ते जोपासण्याचे महत्व बालवयातच बिंबविणे,
२.१.३ पर्यावरणविषयक कृती, प्रतिनिधित्व व संवादकौशल्य याबाबी विकसित करणे, शाश्वत विकासासाठी आवश्यक आचार-विचारांचे आदान-प्रदान, जडणघडण करणे व त्याद्वारे पर्यावरण संवर्धनासाठी नेतृत्वगुण विकसित करणे,

२.१.४ स्थानिक पातळीवर नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनाबाबत, स्थानिक लोकांच्या सहभागाने प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविणे,

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मुलांच्या शिक्षणासाठी परिणामकारक साधनांचा, नाविन्यपूर्ण पध्दतींचा वापर; प्रत्यक्ष कृतीतून व निसर्ग निरीक्षणातून अनुभव शिक्षण; पर्यावरण संरक्षण व संवर्धानसाठी उपक्रम राबविणे या सर्व गोष्टींचा अंतर्भाव करण्यात येईल.

या योजनेअंतर्गत गावातील नागरिक, अशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्यसंस्था, ग्रामसभा आणि अन्य स्थानिक प्रशासनाच्या सहयोगाने स्थानिक/गाव पातळीवर विविध पर्यावरण विषयक उपक्रम राबविले जातील. त्याद्वारे झाडांच्या स्थानिक प्रजातींची लागवड, जल व मृद संधारणाची कामे करणे, परिसरातील घनकचरा, सांडपाण्याचे व्यवस्थापन व योग्य पध्दतीने विल्हेवाट करणे इ. तसेच, सैंद्रिय शेती, गोबर गॅसचा वापर, अपारंपाकि उर्जास्त्रोत (सौर ऊर्जा, पवन ऊर्जा), जैविक इंधन, वर्षाजल संचयन, पर्यावरण संवर्धन, वातावरणीय बदलांवर उपाय, पर्यावरणपूरक गाव/शहर संकल्पना प्रत्यक्षात आणणे इ. विषयांवर गावामध्ये जनजागृती केली जाईल. या सर्व उपक्रमांमध्ये स्थानिक जनतेचा विद्यार्थ्यांबरोबर सहभाग असेल. अशा प्रकारे मुलांना निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन पर्यावरणविषयक स्थानिक समस्यांवर उपाययोजना शोधण्याची क्षमता निर्माण करण्याबरोबरच, पर्यावरण संवर्धनाचे काम नियमितपणे सुरु राहील.

## २.२ योजनेची व्याप्ती:

ही योजना पूर्ण राज्यभरात लागू असून प्रथमत: प्रदूषणाचे प्रमाण जास्त असलेल्या राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील प्रत्येकी २ प्रमाणे १२ जिल्हयातील एकूण ५० इच्छूक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यात येईल. सदर जिल्हे खालीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहेत.-

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग | जिल्हे |
|---|---|---|
| १ | पुणे | पुणे |
| | | सोलापूर |
| २ | नागपूर | चंद्रपूर |
| | | नागपूर |
| ३ | औरंगाबाद | औरंगाबाद |
| | | जालना |
| ४ | अमरावती | अमरावती |
| | | यवतमाळ |
| ५ | नाशिक | नाशिक |
| | | जळगांव |
| ६ | कोंकण | रत्नागिरी |
| | | ठाणे |

मध्ये ग्रामीण, आदिवासी व शहरी भागांचा समावेश राहील. शाळांचा सहभाग स्वेच्छेने (Voluntary) घेतला जाईल. याबाबत इच्छूक शाळा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रपत्र-१ व २ प्रमाणे अर्ज करू शकतील.

### ३. राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था :

योजनेच्या सुरुवातीस प्रथमतः ३ वर्षांच्या कालावधीसाठी केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फ़त 'सेंटर ऑफ़ एक्सलन्स' म्हणून नियुक्त केलेले 'पर्यावरण शिक्षण केंद्र' पुणे (Centre for Environment Education, a centre of excellence designated by MoEF) राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था म्हणून कार्यरत असेल. ही संस्था राज्यस्तरावर पर्यावरण विभागाच्या वतीने योजनेची अंमलबजावणी करण्यास जबाबदार असेल. ही संस्था राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मान्यतेने शाळा, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय अशासकीय संस्थाची निवड करेल. तसेच, योजने बाबतचा अहवाल दर ३ महिन्यांनी राज्य शासानला सादर करेल. पर्यावरणविषयक उपक्रमांची निवड, प्रकल्प साहित्य बनविणे तसेच, योजनाप्रमुखांना (शाळेतील शिक्षक) प्रशिक्षण देणे, हे या संस्थेचे काम असेल. प्रायोजकांकडून निधीची व्यवस्था करण्याचे प्रयत्न देखील ही संस्था करेल. राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थेत पर्यावरण विभागामार्फत एक संनियंत्रण अधिकारी कंत्राटी पध्दतीवर नेमण्यात येईल. तथापि, या संस्थने योजनेच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या कामाचे मूल्यांकन करुन, काम चांगले असल्यास, ती संस्था पुढील टप्प्यासाठी काम करु शकेल. योजनेबाबतची प्रगती समाधानकारक नसल्यास, शासन केंद्रस्थ संस्थेसाठी इच्छूकांकडून आवेदने मागवून निकषांप्रमाणे निवड करण्याची कार्यवाही करेल.

३.१ हया संदर्भात राज्य पर्यावरण विभाग आणि पर्यावरण शिक्षण केंद्र यामध्ये करारनामा करण्यात येईल.

### ३.२ राज्य संनियंत्रण संस्थेची कार्ये -

राज्य संनियंत्रण संस्था राज्यस्तरावर योजनेच्या अंमलबजावणीसाठी संपूर्णतः जबाबदार असेल.

३.२.१ योजनेच्या निकषांनुसार आणि विहित प्रक्रियेनुसार शाळांची निवड करणे,

३.२.२ योजनाप्रमुख शिक्षक व जिल्हा समन्वयक यांना प्रशिक्षण देणे,

३.२.३ योजनेत सहभागी विद्यार्थी-शिक्षकांसाठी, स्थानिक पर्यावरणीय मुद्दे व कृतीकार्यक्रमांवर आधारित शैक्षणिक साधन सामाग्रीची निर्मिती करणे, त्यानुसार आवश्यक वेळापत्रके वेळोवेळी बनवून ती सहभागी शाळांपर्यंत पोहोचविणे,

३.२.४ योजनेतील सहभागी शाळांना निधींचे वितरण करणे,

३.२.५ योजनेसाठी आवश्यक माहिती-संपर्क प्रणाली व इतर व्यवस्थ उभारणे आणि त्यासाठी संबंधितांना प्रशिक्षण देणे,

३.२.६ योजनेसाठी आवश्यक राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची, नेमणूकीसाठी विहित केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या निकषानुसार, कंत्राटी पध्दतीवर पर्यावरण विभागाच्या मान्यतेने नेमणूक करणे,

३.२.७ जिल्हयास्तरीय संस्थांची निवड करणे व त्यांच्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देणे,

३.२.८ जिल्हा समन्वयक अधिकारी व जिल्हास्तरीय संस्थांच्या मार्फत दर महिन्याला शाळा भेट देवून प्रगतीची माहिती घेणे. योजनेतील शाळांना प्रत्येकी तीन महिन्यातून एकदा प्रत्यक्ष भेट देवून कामाचा आढावा घेणे,

३.२.९ दर तीन महिन्यानी योजनेचा आढावा घेण्यासाठी आवश्यक प्रगती अहवाल पर्यावरण विभागास सादर करणे. सदस्य सचिव या नात्याने आढावा समितीची पर्यावरण विभागाच्या वतीने बैठक आयोजित करणे,

३.२.१० योजना मार्गदर्शक समितीच्या वार्षिक आढावा बैठकीसाठी आवश्यक माहिती, चर्चेचे/बैठकीचे मुद्दे पर्यावरण विभागाच्या सहमतीने तयार करणे,

३.२.११ वार्षिक खर्चाचे अंदाजपत्रक बनविणे व ते मान्यतेसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी विभागास सादर करणे,

३.२.१२ या योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी तसेच स्थानिक पातळीवर अधिक संसाधनांची उपलब्धता व्हावी या उद्देशाने अशासकीय संस्था, व्यक्ती, उदयोग - व्यापारी इत्यादी क्षेत्रातून ज्ञान-माहिती उपलब्ध करणे तसेच, आर्थिक भागीदारीसाठी प्रयत्न राज्य संनियंत्रण संस्था करेल आणि तिचा या योजनेच्या वृध्दीसाठी उपयोग करेल,

३.२.१३ निकषांची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांना योजनेअंतर्गत प्रशस्तीपत्रके देणे,

३.२.१४ शाळा, राज्यस्तरीय संस्था व शासन यांच्या दरम्यान योजनेच्या आढाव्यासाठी व माहितीच्या आदान-प्रदानासाठी, संगणकीय प्रणाली विकसित करणे तसेच, या योजनेचे संकेतस्थळ विकसित करणे,

३.२.१५ राज्य संनियंत्रण संस्था या योजनेच्या यशस्वी फलनिष्पत्तीसाठी शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामसभा, स्थानिक प्रशासन व अशासकीय संस्था इत्यादींशी समन्वय करुन शाळेद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये स्थानिकांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करेल,

३.२.१६ या योजनेंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या शाळांना उत्कृष्ट काम केल्याबद्दल प्रशस्तीपत्र व त्या शाळेतील मुख्याध्यापकांना योजना यशस्वीपणे व चांगल्याप्रकारे राबविल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात येईल,

३.२.१७ संपूर्ण राज्यातून निवडलेल्या शाळांची माहिती, संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी व तालुका गट शिक्षण अधिकारी यांना देईल व याबाबतचा समन्वय राखेल,

३.२.१८ याव्यतिरिक्त योजनेच्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी व योजनेची व्याप्ती राज्यभर वाढविण्यासठी आवश्यक इतर प्रयत्न करेल.

## ४. जिल्हास्तरीय अशासकीय संस्था :

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत जिल्हास्तरीय अशासकीय सेवाभावी संस्थांची निवड करण्यात येईल.

### ४.१ जिल्हास्तरीय अशासकीय संस्थांच्या निवडीसाठीचे निकष :-

४.१.१ सदर संस्था ही मान्यताप्राप्त सहकारी संस्था, विश्वस्त संस्था तसेच, अशासकीय असावी.

४.१.२ या संस्थेचा पर्यावरण क्षेत्रात कमीत कमी ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक राहील. त्यात विशेषत: पर्यावरण संदर्भातील स्थानिक महत्वाच्या गोष्टी जसे नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन इ. संदर्भात सदर संस्थेने काम केले असले पाहिजे.

४.१.३ या संस्थेत कार्यरत अधिकारी व कर्मचारी हे अनुभवी व पर्यावरण विषयातील तज्ञ असावेत.

४.१.४ या संस्थेचा स्थानिक जनता, शासकीय कार्यालये, तज्ञ व्यक्ती व इतर अशासकीय संस्थांशी चांगला परिचय व समन्वय असणे आवश्यक आहे.

४.१.५ कार्यालयात मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध असाव्यात.

राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था, राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मान्यतेने जिल्हास्तरीय अशासकीय संस्थांची निवड करेल.

### ४.२ जिल्हास्तरीय अशासकीय संस्थांची कार्ये:

४.२.१ जिल्हापातळीवर या योजनेचा एक महत्वाचा भागीदार या नात्याने राज्य संनियंत्रण संस्थेच्या वतीने बैठका, मेळावे आयोजित करणे. जिल्हा - तालुका पातळीवर, शासकीय व अशासकीय तज्ञ व संसाधन व्यक्ती, संस्था यांची या योजनेसाठी मदत घेणे आणि समन्वय राखणे,

४.२.२ संस्थेच्या कार्यालयात असणाऱ्या मुलभूत सोयीसुविधा, या योजनेसाठी उपलब्ध करुण देणे,

४.२.३ पर्यावरण शिक्षण विषयक कार्य करण्यासाठी, संस्थेत कार्यरत व्यक्तीची राज्य संनियंत्रण संस्थेच्या मान्यतेने निवड करणे व त्यांच्या प्रशिक्षण व क्षमता वृध्दीसाठी वेळोवेळी कार्यक्रमात सहभागी होणे,

४.२.४ सहली, शिबीरे आयोजित करण्यास योजनाप्रमुख शिक्षकांना मदत करणे,

४.२.५ योजनेत सहभागी शाळांना त्यांची कामे करण्यात मदत करणे व भागीदाराच्या रुपात व सेवाभावनेने शाळांमधील कामांमध्ये लक्ष देणे,

४.२.६ शाळा व स्थानिक समाज यातील महत्वाचा दुवा म्हणून भूमिका पार पाडणे,

४.२.७ पर्यावरणाशी व स्थानिक विकासाशी निगडीत संस्थेच्या अन्य उपक्रमांचा, ज्ञान तसेच कृती कार्यक्रमांसाठी शालेय गटांना लाभ मिळवून देणे,

४.२.८ पर्यावरण सेवा योजने अंतर्गत शालेय पातळीवर कृती कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी मदत करणे,

४.२.९ महिन्यातून किमान एकदा जिल्हयातील योजनेत सहभागी शाळांना भेट देणे,

४.२.१० राज्य संनियंत्रण संस्थेच्या जिल्हा समन्वयक अधिकाऱ्याशी मिळून जिल्हा पातळीवर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे. तसेच, प्रत्येक महिन्यास योजनेतील कामांच्या प्रगतीची माहिती अहवाल राज्य संनियंत्रण संस्थेला पूरवणे.

४.२.११ या योजनेच्या यशस्वी फलनिष्पत्तीसाठी शाळा, स्थानिक समुदाय, अशासकीय संस्था इत्यादींशी समन्वय करुन शाळेद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये स्थानिक जनतेचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करणे.

### ५. जिल्हा समन्वयकाची निवड-

जिल्हयातील शाळांच्या गटाचे काम पाहण्यासाठी जिल्हास्तरावर एक जिल्हा समन्वयक नेमला जाईल. राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था विहित पद्धतीने व पर्यावरण विभागाच्या मान्यतेने जिल्हा समन्वयकाची निवड करेल. जिल्हा समन्वयकाचे मानधन पर्यावरण विभागाने दिलेल्या निधीमधून राज्य संनियंत्रण संस्थेमार्फ़त दिला जाईल. मानधनाची कमाल मर्यादा ही शासनाने ठरवल्याप्रमाणे राहील.

### ५.१ जिल्हा समन्वयकाच्या निवडीचे निकष :-

५.१.१ पदवीधर, पदव्युत्तर, विज्ञान शाखेतील उमेदवारास प्राधान्य

५.१.२ पर्यावरण विषयामध्ये कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव आवश्यक

५.१.३ MS-CIT / संगणक, ई-मेल वापरता येणे आवश्यक

**५.२ जिल्हा समन्वयकाची कामे** :-

५.२.१ शाळेतील योजनाप्रमुखांसाठी प्रशिक्षण शिबीरे आयोजित करणे,
५.२.२ योजनेच्या आढाव्यासाठी शाळांना भेटी देणे. या योजनेअंतर्गत विविध उपक्रमांची आखणी करणे, अंमलबजावणी करणे, त्यांचा आढावा घेणे, शिबीरे आयोजित करणे या कामात योजनाप्रमुखांना मदत करणे,
५.२.३ शाळांना आवश्यक शिक्षण साहित्य व उपक्रमांबाबत आवश्यक माहिती पुरविणे. स्थानिक परिस्थितीनुसार प्रकल्प विकसित करणे. प्रकल्प राबविण्यासाठी मार्गदर्शन करणे, समन्वय ठेवणे,
५.२.४ शाळांचे अहवाल संकलित करणे व त्यानंतर चर्चा-भेटींच्या अनुषंगाने स्वतःचा अहवाल तयार करणे,
५.२.५ या याजेनेचे जिल्हास्तरावर प्रतिनिधत्व करणे व इतर शाळांना या योजनेची माहिती देणे,
५.२.६ स्थानिक पातळीवर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करणे,
५.२.७ सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देणे,
५.२.८ या योजनेच्या संकेतस्थळावर स्थानिक समस्यांबाबत व उपक्रमांबाबत माहिती देणे. ती वेळोवेळी अद्यावत करणे.

## ६. योजनेची प्रशासकीय रचना:

६.१ <u>शालेय स्तर</u>: निवडलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये या योजनेअंतर्गत उपक्रम राबविण्यासाठी उपलब्ध शिक्षकांमधून मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्याद्वारे एका शिक्षकाची योजनाप्रमुख म्हणून नेमणूक केली जाईल. निवडलेल्या शालेय स्तरावरील योजनाप्रमुखाला प्रशिक्षणाला पाठविले जाईल. शाळांचे मुख्याध्यापक / प्राचार्य शाळास्तरावर या योजनेच्या दैनंदिन कामावर देखरेख व संनियंत्रण ठेवतील. या योजनेच्या शालेय स्तरावरील अंमलबजावणीची जबाबदारी मुख्याध्यापक / प्राचार्य यांची असेल. योजनाप्रमुख शिक्षक या योजनेच्या दैनंदिन कामासाठी जबाबदार असेल.
६.२ तालुका स्तरावर नेमून दिलेली अशासकीय संस्था या योजनेच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवेल.
६.३ तालुका शिक्षण अधिकारी व गट शिक्षण अधिकारी प्रत्यक्ष शाळेच्या संपर्कात राहून या योजनेच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवतील. योजनेची ध्येयपूर्तता होण्याच्या दृष्टीने सहाय्य व संनियंत्रण करतील. याबाबत शाळेच्या प्रगतीचा त्रेमासिक अहवाल जिल्हाशिक्षणाधिकारी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना पाठवतील.
६.४ जिल्हा स्तरावर नेमून दिलेली अशासकीय संस्था, योजनेचा आढावा घेऊन सदर अहवाल राज्यस्तरीय अंमलबजावणी करणाऱ्या संनियंत्रण संस्थेमार्फत पर्यावरण विभागाला सादर करेल.
६.५ जिल्हा शिक्षण अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी या योजनेचा आढावा घेऊन, शाळेने दिलेला अहवाल सचिव, पर्यावरण विभाग यांना सादर करतील.

### ६.६ शालेय स्तरावरील गटाची रचना:-

६.६.१ योजनेत निवडलेल्या ४ ते ५ शाळांचा जिल्हास्तरीय गट, याप्रमाणे ५० शाळांचा एक राज्यस्तरीय गट तयार होईल.

६.६.२ प्रत्येक शाळेमध्ये ५० मुलांचा पर्यावरण सेवा योजनेचा एक गट तयार केला जाईल. प्रत्येक शाळेत जास्तीत जास्त २ गट तयार करता येतील. त्यात ७ वी ते १२ वीच्या कोणत्याही विद्यार्थ्यांना स्वेच्छेने (Voluntary) सहभागी होता येईल. या संदर्भात काम करण्याची तयारी असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक, राज्यस्तरीय संस्थेस कळवतील.

६.६.३ शाळेमध्ये या योजनेअंतर्गत उपक्रम राबविण्यासाठी ३ वर्षांसाठी एका योजनाप्रमुखाची नेमणूक केली जाईल. निवडलेला शिक्षक किमान ३ वर्षे सदर योजनेवर कार्यरत असेल तेव्हा या कालावधीत त्याची बदली होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

६.६.४ शाळांचे जिल्हास्तरावर काम पाहण्यासाठी एक जिल्हा समन्वयक नेमला जाईल. निवडलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविणे आवश्यक राहील. ही योजना माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचाच एक भाग असल्याने, योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यासाठी शाळा/ महाविद्यालयांनी सहकार्य करणे आवश्यक राहील. यामध्ये शासन पुरस्कृत तसेच अन्य स्त्रोतांकडील पुरस्कृत शाळांचा समावेश असेल.

## ७. योजनेअंतर्गत करावयाची कामे:

### ७.१ गटाची रचना-

७.१.१ शाळांमध्ये तयार करण्यात आलेल्या गटांच्या सहाय्याने या योजनेचे काम होणार असल्याने हे गट विशेष महत्वाचे आहेत. या गटांमार्फत शाळा, स्थानिक लोक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याशी संवाद साधला जाईल.

७.१.२ या योजनेअंतर्गत उपक्रम राबविण्यासाठी, शाळेतील नियमीत वेळापत्रकाव्यतिरिक्त आठवडयातील कोणत्याही एका दिवसाचे ३ तास देण्यात येतील. यामध्ये वर्गाच्या बाहेरील कृती शिक्षणाचा फक्त समावेश असेल. यासाठीचा दिवस व वेळ शाळेमार्फत ठरवला जाईल. NCC, Scouts व Guides यांच्या धर्तीवर या योजनेसाठी जागा व वेळ शाळेद्वारे उपलब्ध करुन दिला जाईल.

७.१.३ शाळेतील गट, गावातील लोक, नेमलेली संस्था, ग्रामसभा इ. यांच्या सहाय्याने स्थानिक गरजेनुसार पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम ठरवून, त्याचा आराखडा तयार करुन तो राबवतील.

७.१.४ शाळेतील / महाविद्यालयातील मुला-मुलींना या योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

७.१.५ 'राष्ट्रीय हरित सेना' योजनेतील सहभागी शिक्षक व विद्यार्थ्यांना, या योजनेत नाव नोंदवता येणार नाही. तसेच 'पर्यावरण सेवा योजनेतील' सहभागी शिक्षक व विद्यार्थ्यांना 'राष्ट्रीय हरित सेना' योजनेत नाव नोंदवता येणार नाही.

७.१.६ शाळांमध्ये या योजनेअंतर्गत गट स्थापन करणे, उपक्रम राबविणे ही कामे, योजनाप्रमुख, शाळेच्या / महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांच्या मदतीने व मार्गदर्शनाने करेल.

७.१.७ जिल्हा समन्वयकाच्या सूचनांनुसार व योजनेच्या मार्गदर्शक सूचीनुसार योजनाप्रमुख योजनेची कार्यवाही करेल.

७.१.८ योजनेअंतर्गत उपक्रमांचा आराखडा बनविणे, उपक्रम राबविणे याबाबत मुलांना मदत करणे,त्यांचे मूल्यमापन करुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे ही योजनाप्रमुखाची महत्वाची जबाबदारी असेल.

७.१.९ या योजनेअंतर्गत योजनाप्रमुखाने आयोजक, शिक्षक, समन्वयक, पर्यवेक्षक, प्रशासक व जनसंपर्क अधिकारी या सर्व भूमिका पार पाडणे अपेक्षित आहे. जेणेकरुन या योजनेचा प्रसार व प्रचार होण्यास मदत होईल.

७.१.१० एकदा तयार करण्यात आलेल्या गटासाठी या योजनेचा कालावधी २ वर्षे असेल व या कालावधीत ५ ते १० दिवसांचे किमान २ कॅम्प / शिबीरे घेण्यात येतील. स्थानिक समस्यांवर काम करायचे असल्याने ही शिबीरे तालुक्याच्या / जिल्ह्याच्या हद्दीतच घेतले जातील.

## ७.२ उपक्रम ठरविणे व शिक्षण साहित्य तयार करणे :-

नेमलेल्या राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थेची प्रामुख्याने ही जबाबदारी असेल की, नाविन्यपूर्ण प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञान, चालू असलेली विकासकामे आणि मान्यताप्राप्त तंत्रज्ञान यांसारख्या गोष्टींची माहिती विविध क्षेत्रात कार्यरत संबंधित सरकारी व अशासकीय संस्थांकडून मिळवली जाईल.

राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था, गावाचा अभ्यास करुन तेथील पर्यावरणीय समस्यांवर आधारित उपक्रमांची आखणी करेल. त्यानुसार वर्षभरात मुलांनी करावयाचे विविध उपक्रम निश्चित केले जातील (short term & long term projects) जसे रोपांची नर्सरी तयार करणे, रोपे तयार करुन ती लावणे आणि कमीतकमी २ ते ३ वर्ष निगा राखणे, त्याची जोपासना व त्या संलग्न उपाययोजना करणे, झाडे जगण्याचे प्रमाण निश्चित करुन ते उद्दिष्ट गाठणे, सेंद्रिय खत बनविणे, बांध घालणे, जलसंधारण इ.

## ७.३ उपक्रमांची यादी :-

७.३.१ स्थानिक संसाधने जसे, माती, पाणी जैवविविधता, आणि ऊर्जा यांच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

७.३.२ स्थानिक समस्या जसे, प्रदूषण, कचरा यांवर अभ्यास करणे.

७.३.३ वरील विषयासंदर्भात तज्ञ मंडळी व स्थानिक विषयांची माहिती असलेल्या लोकांबरोबर चर्चा करणे.

७.३.४ स्थानिक पातळीवर आवश्यक व स्थानिक लोकांच्या सहभागाने करता येतील असे प्रत्यक्ष कृतीवर आधारीत खालीलप्रमाणे प्रकल्प हाती घेणे अपेक्षित असेल.

- माती व पाणी यांचे संवर्धन व उपाययोजना
- जलस्त्रोतांचे संरक्षण व संवर्धन
- रोपवाटीका निर्माण करणे
- परिसंस्था व जैवविविधता
- सेंन्द्रिय शेती संकल्पना
- ऊर्जाबचत संकल्पना
- बायोगॅसचा वापर
- इकोहाऊसिंग संकल्पना
- जैविक इन्धनासाठी झाडे लावणे
- इकोसॅन (इकॉलॉजिकल सॅनिटेशन)
- जैविक खत निर्मिती व वापर
- सांडपाणी व्यवस्थापन आणि पुनर्वापर
- घनकचरा व्यवस्थापन व उर्जा निर्मिती

- हरितशाळा व शाळेतील पाणी व स्वच्छतेबद्दल सुधारणा
- इकोव्हिलेज / इकोसिटी

घर तेथे झाड, गावरान, वनराई, रस्त्याच्या लगत हरितपट्टा विकसित करणे, परसबाग, स्मृतीवने, आर्युवेदीक वनस्पती (Herbal & Aromatic Plants) उद्यान इ.

**७.४ शाळांना योजनानिधी-**

उपरोक्त प्रस्तावित कामांसाठी तसेच या योजने अंतर्गत इतर कामांसाठी शाळेला प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरमहा रु.१५०/- असा निधी दिला जाईल. हा निधी संपूर्ण गटाच्या योजने अंतर्गत करावयाच्या कामासाठी वापरणे अनिवार्य राहिल.

**८. योजनाप्रमुख नियुक्ती : -**

८.१ शाळेमध्ये या योजनअंतर्गत उपक्रम राबविण्यासाठी शाळेचे / महाविद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य, जिल्हा समन्वयक व राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थेच्या मदतीने एक योजनाप्रमुख नेमतील व तसे राज्य शासनास कळवतील.

८.२ शाळांमधील शिक्षकांमधून विशेषत: विज्ञान विषयाच्या शिक्षकांमधून योजनाप्रमुखाची निवड करण्यात येईल.

८.३ मुलांशी चांगला संवाद साधू शकणाऱ्या व सामाजिक कामाची आवड असणाऱ्या शिक्षकाची या करीता निवड करण्यात यावी.

**८.४ योजनाप्रमुखाची कार्ये :**

८.४.१ मुलांना त्यांच्या स्थानिक पर्यावरणाबाबत व पर्यावरणीय समस्यांबाबत जागृत करणे जेणेकरुन ते भविष्यात पर्यावरण संवर्धनाबाबत समाजाचे प्रतिनिधत्व करु शकतील.

८.४.२ स्थानिक नैसर्गिक संसाधनांच्या व पर्यावरणाच्या संवर्धनाबाबत तसेच समस्यांबाबत मुलांकडून प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविणे.

८.४.३ या कामात मुलांबरोबरच स्थानिक जनता, स्थानिक संस्था यांचा सहभाग मिळवणे.

८.४.४ मुलांमध्ये व लोकांमध्ये 'पर्यावरणीय सजगता' निर्माण करणे.

**९. शिक्षकांचे प्रशिक्षण:**

योजना प्रमुखाला व जिल्हा समन्वयकाला या योजनेअंतर्गत ३ महिन्यांच्या आत प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण कालावधी शक्यतो शालेय सुट्टी दरम्यान निश्चित करण्यात येईल. नेमलेल्या राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थेमार्फत किंवा या क्षेत्रातील तज्ञ संस्थेकडून योजनाप्रमुखांना प्रशिक्षण देण्यात येईल. सदर प्रशिक्षण घेणे योजना प्रमुखास बंधनकारक राहील. त्यात शिक्षकांना पर्यावरण व शाश्वत विकास या विषयांबाबत माहिती देण्यात येईल. पर्यावरण शिक्षणासाठी वापरायची साधने व पध्दती यांची माहिती देण्यात येईल.

**९.१ प्रशिक्षणाद्वारे योजनाप्रमुखांना खालील गोष्टी समजण्यास मदत होईल.-**

९.१.१ पर्यावरणशास्त्र व शाश्वत विकास

९.१.२ पर्यावरण शिक्षण - शिक्षणासाठी वापरायची साधने, पध्दती

९.१.३ चर्चा व प्रयोग यांवर आधारीत पर्यावरण शिक्षणासाठीच्या पध्दती, स्थानिक स्तरावर आधारीत पर्यावरण शिक्षण व कृती प्रकल्प
९.१.४ मुलांच्या पर्यावरण कृती प्रकल्पांची आखणी व देखरेख
९.१.५ स्थानिक लोकांचा सहभाग मिळविण्याच्या पध्दती
९.१.६ ICT व पर्यावरण शिक्षण

**९.२** या व्यतिरिक्त प्रशिक्षणामध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव असेल :

९.२.१ योजनेचे शालेय स्तरावरील वार्षिक वेळापत्रक
९.२.२ योजनेची माहिती मिळवणे, प्रकल्पांविषयी संकल्पना, अहवाल सादर करणे या कामासाठी योजनेच्या संकेतस्थळाचा वापर करणे.
९.२.३ वार्षिक अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सादर करणे.

**१०. मानधन :**

अ) **शिक्षकांना मानधन-** या योजनेअंतर्गत काम केल्याबद्दल शाळेद्वारे नेमलेल्या योजनाप्रमुखांना नियमित वेतनाव्यतिरिक्त दरमहा रु. १०००/- मानधन दिले जाईल. यामध्ये योजनेचे कार्य, प्रशिक्षण कालावधी व योजने अंतर्गत घ्यावयाच्या शिबीरांचा कालावधी याचा समावेश असेल.

ब) **विद्यार्थ्यांना प्रोत्साहन-** योजना राज्यभरात लागू झाल्यानंतर, या योजनेत दोन वर्षाचा कालावधी यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर सहभागी विद्यार्थ्याला प्रशस्तीपत्रक देण्यात येईल. हे प्रशस्तीपत्रक NSS/NCC च्या समतुल्य असेल.

क) **शाळांना प्रोत्साहन -** योजनेंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या शाळांना प्रशस्तीपत्र देण्यात येईल तसेच, उत्कृष्ट काम केलेल्या शाळेतील मुख्याद्यापकांना सन्मानपत्र देण्यात येईल.

**११. माहिती संपर्क तंत्रज्ञान (Information Communication Technology-ICT) सहाय्य** :

या योजनेसाठी मराठी / इंग्रजी माध्यमातील संकेतस्थळावर माहिती दिली जाईल त्यात खालील गोष्टींचा अंतर्भाव असेल:

१. योजनेसंदर्भातील माहिती
२. योजनेअंतर्गत राबविण्याच्या विविध उपक्रमांची शिक्षकांसाठी उपयुक्त माहिती
३. विद्यार्थ्यांचे उपक्रम व प्रकल्प यांची माहिती संकेतस्थळावर टाकण्याची व्यवस्था करणे.
४. योजनाप्रमुख व जिल्हासमन्वयक यांचे अहवाल संकेतस्थळावर टाकण्याची व्यवस्था करणे.
५. योजनेसंदर्भातील कार्यक्रमांची सूचना देणे.

संकेतस्थळासाठी जागा पर्यावरण विभागाद्वारे त्यांच्या सर्व्हरवर उपलब्ध करुन देण्यात येईल. यावर टाकावयाची माहिती ही विभागातील IT सपोर्टच्या मदतीने, राज्यस्तरीय संस्थेशी चर्चेनुसार निर्माण केली जाईल. शाळांमध्ये इंटरनेट कनेक्शन असलेली संगणके उपलब्ध केली जातील. तसे नसल्यास संबंधित शाळेने या उपक्रमासाठी वेगळया संगणकाची व्यवस्था करावी.

**१२. योजनेचा आढावा व देखरेख :**

शाळांच्या गटाचा २ स्तरावर आढावा घेण्यात येईल-

**१२.१ राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थेमार्फत-**

राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था जिल्हास्तरीय अशासकीय संस्था तसेच जिल्हा स्मन्वयक अधिकारी यांच्या मदतीने योजनेचा मासिक प्रगती आढावा घेतील. यासाठी आवश्यक प्रारूपांमध्ये खालील बाबींचा समावेश असेल-

१२.१.१ शालेय गटाची स्थापना, योजनाप्रमुख व सहभागी सदस्यांची माहिती
१२.१.२ योजनाप्रमुख शिक्षकाचे प्रशिक्षण
१२.१.३ योजनेचे माहितीपत्रक आणि इतर शैक्षणिक साधन सामग्रीची पोहोच
१२.१.४ योजनाप्रमुख शिक्षक व सदस्यांच्या पर्यावरण-पासपोर्टची पूर्तता
१२.१.५ शालेय निधीची उपलब्धता
१२.१.६ शालेय पातळीवरील आर्थिक व भौतिक उद्दिष्टांची स्थिती, संलग्न - कृती कार्यक्रमांची विस्तृत माहिती, फ़ोटोग्राफ़, वर्तमान पत्रातील प्रसिध्दी इ.सह मासिक प्रगती अहवाल.

**१२.२ शिक्षण अधिकारी / शासकीय अधिकारी यांच्यामार्फत-**

१२.२.१ स्थानिक पातळीवरील शिक्षण अधिकारी / शासकीय अधिकारी यांनी योजनेत सहभागी शाळांना भेटी देणे अपेक्षित आहे. या भेटींवर आधारित आणि वेळोवेळी निर्माण केलेल्या प्रारूपानुसार हे अधिकारी आपला आढावा आणि देखरेख अहवाल पर्यावरण विभाग,शिक्षण विभाग व जिल्हा परिषद यांना सादर करतील.
१२.२.२ तालुका शिक्षण अधिकारी व गट शिक्षण अधिकारी शाळेच्या प्रगतीचा त्रेमासिक अहवाल जिल्हाशिक्षण अधिकारी यांना पाठवतील.
१२.२.३ जिल्हा शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी या योजनेचा आढावा घेऊन तसा अहवाल सचिव, पर्यावरण विभाग यांना सादर करतील.
१२.२.४ योजनाप्रमुख मुख्याध्यापकांना मासिक अहवाल देतील. तसेच वेळोवेळी ई-मेल द्वारे सर्व संबंधितांना अहवाल पाठवतील.
१२.२.५ तसेच निवडलेल्या अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी दर महिन्याला शाळेला भेट देतील. जिल्हास्तरीय आढाव्यासाठी जिल्हा शिक्षण अधिकारी अशासकीय संस्थेच्या मदतीने शाळांना भेट देतील.

**१३ मार्गदर्शक समिती :**

**अ)** राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे मार्गदर्शक समितीची स्थापना करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव | .. | अध्यक्ष |
| सचिव, उच्च व माध्यमिक | .. | सदस्य |
| सचिव, ग्रामिण विकास | .. | सदस्य |
| सचिव, वने | .. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| सचिव, जलसंधारण | .. | सदस्य |
| सचिव, नगरविकास | .. | सदस्य |
| सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता | .. | सदस्य |
| सचिव, आदिवासी विकास | .. | सदस्य |
| सचिव, समाजकल्याण | .. | सदस्य |
| सचिव, वित्त | .. | सदस्य |
| पर्यावरण क्षेत्रात कार्यरत अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी | .. | सदस्य |
| पर्यावरण क्षेत्रातील तज्ञ | .. | सदस्य |
| राज्य संनियंत्रण संस्थेचे प्रतिनिधी | .. | सदस्य |
| सचिव, पर्यावरण | .. | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा -**

समितीच्या सदस्यांमधील पर्यावरण क्षेत्रात कार्यरत अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी व पर्यावरण क्षेत्रातील तज्ञ यांची निवड सचिव (पर्यावरण) यांच्यामार्फ़त केली जाईल. त्यांची निवड ३ वर्षांच्या कालावधीसाठी असेल. तसेच सचिव (पर्यावरण) या क्षेत्रातील इतर तज्ञ व्यक्तींना बैठकीस आमंत्रित करू शकतील.

सदर समिती योजनेच्या कामांबाबत मार्गदर्शन करेल तसेच आवश्यकतेनुसार प्रशासकीय मंजूरी, वित्तीय तरतूदी, योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या समस्या इ. चा आढावा घेवून सदर समस्या सोडविण्याबाबत मागदर्शन करेल. योजनेची व्याप्ती वाढविणे, योजनेत सुधारण करणे इ.बाबत मागदर्शन करेल.  ही समिती वर्षातून एकदा या योजनेसंदर्भात आढावा घेईल.

**ब) आढावा समिती :**

सचिव, पर्यावरण यांचे अध्यक्षतेखाली सदर योजनेचा आढावा घेण्यासाठी खालीलप्रमाणे आढावा समिती गठित करण्यात येत आहे.-

| | | |
|---|---|---|
| सचिव, पर्यावरण | .. | अध्यक्ष |
| शास्त्रज्ञ-१/उप सचिव/संचालक, पर्यावरण विभाग | .. | सचिव |
| सहसचिव, वने | .. | सदस्य |
| सहसचिव/उप सचिव, शिक्षण विभाग | .. | सदस्य |
| संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे | .. | सदस्य |
| संचालक, माध्यमिक शिक्षण | .. | सदस्य |
| जिल्हास्तरीय अशासकीय सेवाभावी संस्था (जिल्हानिहाय) | .. | सदस्य |
| पर्यावरण शिक्षण व जनजागृती क्षेत्रातील तज्ञ | .. | सदस्य |
| संचालक, कॉन्फीडरेशन ऑफ इंडिया इंडस्ट्री, मुंबई. | .. | सदस्य |
| संचालक, चेंबर ऑफ हौसिंग इंडस्ट्री, मुंबई | .. | सदस्य |
| सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई | .. | सदस्य |
| कार्यक्रम संचालक, राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था | .. | सदस्य सचिव |

**आढावा समितीची कार्यकक्षा :**

दर ३ महिन्यांनी सचिव (पर्यावरण) सदर योजनेचा आढावा घेतील. सुधारणेसाठी आवश्यक सूचना व शिफारशी करतील तसेच योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत निर्णय घेतील. या समितीमध्ये सचिव (पर्यावरण) यांच्या मान्यतेने सदस्य सचिव औद्योगिक आस्थापनांचे प्रतिनिधी व इतर प्रायोजक यांना आवश्यकतेनुसार आमंत्रित करू शकतील. सचिव, पर्यावरण संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी व जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर योजनेचा आढावा घेण्यासाठी बैठकीस आवश्यकतेनुसार आमंत्रित करतील.

## १४. **योजनेचा अंदाजित खर्च** -

योजनेत खर्चाच्या खालील बाबी अंतर्भूत असतील :-

१. योजनाप्रमुखांना रु.१०००/- दरमहा याप्रमाणे मानधन देण्यात येईल.

२. शाळेला दरमहा प्रत्येक मुलामागे रु. १५०/- याप्रमाणे योजनेच्या अंमलबजावणीसाठी एकत्रित निधी देण्यात येईल. (कमाल मर्यादा १०० विद्यार्थी)

३. प्रशिक्षण, समन्वयन, शिक्षण साहित्य तयार करणे, बैठका घेणे, योजनेची अंमलबजावणी या कामासाठी अंदाजे रु. ३३,५०,०००/- इतकी रक्कम लागेल.

४. अ) राज्यस्तरीय संनियंत्रण अधिकारी - (कंत्राटी पध्दतीवर पर्यावरण विभागामार्फत नियुक्त) - प्रतिमाह रु. २५,०००/-.

५. ब) जिल्हास्तरीय गट संनियंत्रण अधिकारी - (कंत्राटी पध्दतीवर पर्यावरण विभागामार्फत नियुक्त)- प्रतिमाह रु. १५,०००/-.

उपरोक्त बाबींनुसार दरवर्षी योजनेत अंतर्भूत शाळा व तद्नुषंगिक जिल्हास्तरीय गट, मनुष्यबळासाठी निधी अर्थसंकल्पित करण्यात येईल.

## **१४.१ योजनेसाठी निधी**

### **अ) निधीचे स्त्रोत -**

पर्यावरण विभागामार्फ़त देण्यात आलेल्या निधीव्यतिरिक्त, सदर योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद खालीलप्रमाणे केली जाईल.

१. शासकीय विभाग
२. पर्यावरण क्षेत्रात कार्यरत अशासकीय संस्था / विश्वस्त संस्था/ सहकारी संस्था
३. सरकारमान्य संस्था / मंडळ
४. औद्योगिक आस्थापना
५. पर्यावरण क्षेत्रात कार्यरत जागतिक संघटना

या योजनेच्या व्यापक उद्दिष्टपूर्तीसाठी अशासकीय संस्था, उद्योग-व्यापार या क्षेत्रातील संस्था व व्यक्ती आर्थिक स्वरुपात मदत करुन प्रायोजकाच्या भूमिकेत सहभागी होवू शकतील. सदर प्रायोजक या कार्यक्रमांतर्गत शाळांसाठी निधीच्या अथवा साहित्याच्या स्वरूपात तसेच, शाळेने निवडलेले उपक्रम राबविणे या स्वरूपात मदत करू शकतो. अशा संस्था-व्यक्तींनी

दिलेला निधी स्वतंत्र बँक खात्यामध्ये राज्य संनियंत्रण संस्थेमार्फत योजनेंतर्गत शाळांना शक्यतो ECS पध्दतीद्वारे जमा होईल आणि योजनेसाठी त्याचा वापर व विनियोगाची जबाबदारी राज्य संनियंत्रण संस्था व पर्यावरण विभाग संयुक्तपणे पार पाडतील.

**अ-२)** खाजगी संस्था, विश्वस्त संस्था, अशासकीय संस्था, औद्योगिक आस्थापना, सरकारमान्य संस्था, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत जागतिक संघटना इ. समवेत आर्थिक मदतीसाठी रीतसर करार करून सहकार्य घेण्यात येईल. औद्योगिक आस्थापना किंवा बांधकाम प्रकल्प यांना पर्यावरण अनुमती देताना, या योजनेसाठी त्यांच्या क्षमतेप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्याबाबत अट घालण्यात यावी जेणेकरून या योजनेसाठी अशा औद्योगिक आस्थापना, प्रकल्प / शाळांसाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रित्या आर्थिक मदत करू शकतील.

**ब) योजनेत इतर क्षेत्रांची भागीदारी -**

या योजनेच्या व्यापक उद्दिष्टपूर्तीसाठी अशासकीय संस्था, उद्योग-व्यापार याक्षेत्रातील संस्था तसेच व्यक्ती भागीदारी करु शकतील. ही भागीदारी संस्थेच्या-व्यक्तीच्या कामांचा, पर्यावरण आणि शाश्वत विकासाशी संबंधित ज्ञान, तंत्रज्ञान, उपकरणे यांचा सहभागी शाळांना लाभ देणे अशा स्वरुपात करता येईल. त्याचप्रमाणे काही शाळा दत्तक घेवून या योजनेत भागीदार होता येईल. अशा भागीदार संस्था शाळांना या योजनेच्या अंतर्गत करावयाच्या कामांसाठी थेट आर्थिक मदतही करु शकतील. राज्य संनियंत्रण संस्था अशा भागीदारींच्या राबवणुकीसाठी जबाबदार असेल व अशा इच्छुक संस्था-व्यक्तीशी करार करु शकेल.

भागीदारी व प्रायोजकात्वाशी निगडीत कोणत्याही अन्य मुद्यांचा वेळोवेळी आढावा घेवून आवश्यक त्या प्रक्रिया, कार्यवाही याविषयी पर्यावरण विभागाच्या संमतीने राज्य संनियंत्रण संस्था आवश्यक प्रयत्न करेल.

**क) निधी वाटप पध्दत:**

नेमलेल्या राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थेला, योजनाप्रमुखांना प्रशिक्षण देण्यासाठी, शिक्षण साहित्य तयार करण्यासाठी व शाळांना निधी पुरविण्यासाठी निधीची आवश्यकता असेल. यासाठी समन्वयन संस्था तसेच, शाळांमध्ये योजनेच्या नावाने स्वतंत्र बँक खाते उघडण्यात येईल.

अ) शाळांना राज्यस्तरीय संस्थेमार्फत निधी पुरविण्यात येईल. राज्यस्तरीय संस्थेचे या निधीसाठी एक वेगळे बँक खाते असेल.

ब) प्रायोजकांमार्फत मिळालेला निधी जमा करण्यासाठी योजनेच्या नावाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात स्वतंत्र बँक खाते उघडण्यात येईल, या खात्यावर सचिव, पर्यावरण यांचे नियंत्रण असेल व या स्वतंत्र खात्यामधून प्रायोजकाकडून निवडलेल्या शाळांना अथवा त्यांनी प्रस्तावित केलेल्या कामांना राज्य संनियंत्रण संस्थेमार्फ़त विहित पद्धतीनुसार निधी उपलब्ध करून देण्यात येईल. प्रायोजक, त्याच्या संस्थेच्या निर्णयानुसार/नियमावलीनुसार आवश्यकतेनुसार संबंधित शाळेच्या या योजनेसाठी उघडण्यात आलेल्या खात्यामध्ये या योजनेच्या कामांसाठी निधी जमा करु शकतो.

क) राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थेस उपलब्ध करुन दिलेले अनुदान या संस्थेद्वारे शाळेच्या/ कनिष्ठ महाविद्यालयाच्या या योजनेसाठी लागणाऱ्या स्वतंत्र खात्यात प्रथम तीन महिन्यांचे

अनुदान वितरीत केले जाईल. ३ महिन्यांनंतर त्यांच्या प्रगती अहवालानुसार व उपयोगिता प्रमाणपत्र विभागास पाठविल्यानंतर प्रगती समाधानकारक असल्यास विभागाच्या सहमतीने पुढील अनुदान राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थद्वारे वेळोवेळी गरजेनुसार देण्यात येईल.

**१५. योजनेचा खर्च:**:

या योजनेवर होणारा खर्च मागणी क्रमांक यू-४,३४३५, परिस्थितीकी व पर्यावरण, ०४ प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३ वायू व जल प्रदूषण प्रतिबंध-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना -(०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(१३) पर्यावरणविषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४१५ १३०२), ३१ सहायक अनुदान या अर्थसंकल्पीय शिर्षाखाली नोंदवावा व त्या शिर्षाखाली केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

**१६.** सदर शासन निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार दिलेल्या अनुमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**१७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०११४२०४४४४००१ आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वल्सा आर.नायर सिंह)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,मदतकार्य व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
विभागीय आयुक्त,
जिल्हाधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
शिक्षण संचालक,
सहाय्यक शिक्षण उपसंचालक,
संबंधित शिक्षणाधिकारी (सर्व जिल्हे)

कार्यक्रम संचालक, पर्यावरण शिक्षण केंद्र, (CEE) पुणे
सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महा-१ व महा-२-मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग (अर्थ-५/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई
पर्यावरण विभागातील सर्व कार्यासने.
निवडनस्ती.

**प्रपत्र- १**

**पर्यावरण सेवा योजनेमध्ये सहभाग घेणेबाबत शाळेने द्यावयाचे पत्र**

प्रति,
संचालक,
राज्य संनियंत्रण संस्था,
पर्यावरण सेवा योजना
द्वारा - पर्यावरण शिक्षण केंद्र
अ-१०, गार्डन इस्टेट सोसायटी
नागरस रोड, औंध, पुणे -४११००७

विषय : पर्यावरण सेवा योजनेमध्ये सहभाग घेणेबाबत -

....

महोदय,

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या पुढाकाराने आणि शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने सुरु होत असलेल्या पर्यावरण सेवा योजनेबद्दल तपशिलवार माहिती मिळाली आहे.

आमच्या शाळेने या आधीही पर्यावरण संवर्धनासंबंधी जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. त्या संबंधी सर्व माहिती दिलेल्या प्रपत्रामध्ये भरुन देत आहोत.

सदर योजनेंतर्गत मिळणारा निधी जमा करण्यासाठी योजनेच्या नावे शाळेमार्फत स्वतंत्र बँक खाते उघडण्यात येईल.

आमची शाळा सर्व निकषांची पूर्तता करीत असून आमच्या शाळेला या योजनेमध्ये सहभागी होण्याची इच्छा आहे, तरी या योजनेमध्ये सहभागी करुन घ्यावे, ही विनंती.

धन्यवाद !

मुख्याध्यापकांचे नाव
शिक्का

**प्रत -** सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई

------

## प्रपत्र - २

## शाळेने भरुन द्यावयाची माहिती

**विभागाचे नांव:** कोकण / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती/ नागपूर ( √ टिक करावी)

जिल्हयाचे नांव : -----------------------------------------------------

तालुक्याचे नांव : -----------------------------------------------------

इ एम आय एस क्र. : -----------------------------------------------------

संस्थेचे पूर्ण नांव : -----------------------------------------------------

शाळा स्थापनेचे वर्ष : -----------------------------------------------------

शाळेचे पूर्ण नांव : -----------------------------------------------------

शाळेचा पूर्ण पत्ता : -----------------------------------------------------

-----------------------------------------------------

(पिनकोड व जवळच्या खुणेसह)

दूरभाष (टेलिफोन क्रमांक): कोड ------------ क्रमांक ---------------------------

फॅक्स क्रमांक : कोड ----------- क्रमांक ---------------------------

मुख्याध्यापकांचा भ्रमणध्वनी क्रमांक ------------------------------------------------

पर्यावरण योजना प्रमुखांचे नांव ----------------------------------------------------

भ्रमणध्वनी : ---------------------------------------

ई-मेल (टपाल) ------------------------------------

माध्यमिक शाळा :५ ते १० वी/८ वी ते १० वी/८ वी ते १२ वी/ ११-१२ वी (कनिष्ठ महाविद्यालय)

शाळेची वेळ : सोमवार ते शुक्रवार -------------------------- शनिवार --------------------

शाळा किती शिफ्टमध्ये भरते ------------------- १ / २ भरत असल्याची वेळ -------------

शाळेमध्ये राष्ट्रीय हरित सेनेची तुकडी स्थापन करण्यात आली आहे का ? होय / नाही

असल्यास संबंधित शिक्षकांचे नाव व संपर्क क्रमांक : ---------------------------------------

सदर योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या गट प्रमुखाचे नांव : --------------------------------

शैक्षणिक पात्रता :---------------------------- शैक्षणिक अनुभव : -----------------------

शाळेकडे संगणक व इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे का ? होय / नाही.

या सुविधा नसल्यास, शाळा या योजनेसाठी त्या उपलब्ध करून देणार आहे का? होय / नाही.

-------------------------------------------------------------------------------

शाळा या योजनेसाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यास तयार आहेत का? होय / नाही.

शाळेस सदर योजनेत प्रस्तावित केलेल्या सर्व अटी मान्य आहेत का? होय /नाही.

******